भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१०/२०१७

**१) दारू बंदीच्या कारणावरून महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २९/१०/२०१७ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही दारू बंदी समीतीच्या बाया सोबत बसली असता, दारू बंदी केल्याचे कारणावरून यातील आरोपीतांनी त्यांना पाहुन या बायांनी दारू बंदी केली, असे म्हणुन त्यांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीस मारपीट केली व मरण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४,३२३,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) फेसबुक आयडी तयार करून फेसबुक मॅसेंजरवर वाईट संदेश पाठवील्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक १२/१०/२०१७ ते २६/१०/२०१७ चे दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने इंटरनेटवर फिर्यादीची फेसबुक आयडी तयार करून त्यावर फिर्यादीचे परीवाराचा फोटो लावुन फिर्यादीचे मित्राचे फेसबुक मॅसेंजर वर वाईट संदेश पाठवील्याने फिर्यादी दिनेश भगतजी आकरे वय ३२ वर्ष रा. केसलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ६६(ड)आय. टी ॲक्ट भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. तेलुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) सार्वजनीक ठिकाणी शांतता भंग करून वाहतुकीस अडथडा व जनजीवन विस्कळीत करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ३०/१०/२०१७ चे ११.४५ वा. दरम्यान यातील गुप्ता व पुरूषलानी यांचे कुंटुब जुना बसस्टॉप येथे राहत असुन त्याचे बांधकाम वरून वाद चालु असल्याचे माहीती वरून, घटना ठिकाणी जावुन पाहीले असता गुप्ता व पुरूषलानी कुंटुब आरोपी हे सार्वजनीक शांतता भंग करून वाहतुकीस अडथडा व जनजिवन विस्कळीत करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनी दुगावकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १६० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. .

**४) सिसीटीव्ही कॅमेऱ्याची मशीन व ड्राव्हर मध्ये ठेवलेले नगदी पैशाची चोरी : —**

दिनांक २८/१०/२०१७ ते दि. २९/१०/२०१७ चे रात्र दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे आर.एस. पोलट्री फार्मचे ग्रिल मधुन आत प्रवेश करून सिसीटीव्ही कॅमेऱ्याची पावर मशीन व काऊंटरचे ड्राव्हर मध्ये ठेवलेले नगदी ७,६००/रु असा एकण ९,१०० /रु चा माल कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी राधेश्याम रूपचंद बोंदरे वय ३६ वर्ष रा. मामा चौक गोंदीया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ४५४,५५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**५) मोबाईल दुकानातील मोबाईल व नगदी पैशाची चोरी. : —**

दिनांक २९/१०/२०१७ चे २०.३० ते ३०/१०/१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादचे याशीनी मोबाईल शॉप दुकानातील मागील टिनाचे नट बोल्ट काढुन टिनाचा पत्रा वाकवुन आत दुकानात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोराने दुकानात ठेवलेले ,लावा कंपनीचे चार मोबाईल जुने, वापरते १ नग इंन्टेक्स कंपनीचे ॲन्डराईड मोबाईल, बॅटरी १२ नग, चार्जर ३० नग , इयरफोन ८० नग, ग्लास १५० नग, कवर ४० नग, व गल्यातील चिल्लर नाने ५००/रु असा एकुन ३६,५००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादी अशरीम याशीम कुरेशी वय ३२ वर्ष रा. पी. डब्ल्यु कॉलोनी साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**६) घरघुती वादावरून भांडण करून जबर दुखापत केल्याने गुन्हा नोंद . : –**

दिनांक ३०/१०/२०१७ चे. १३.३० दरम्यान यातील फिर्यादीचा पती भैयालाल श्रीराम सुरजोसे वय ३२ वर्ष व आरोपी यांच्यात घरघुती वादावरून भांडण होवुन आरोपीने फिर्यादीचे पतीला मारहान केली व लांबाझोंबी मध्ये नाकावर जोरात बुक्की मारल्याने नाक फुटला व नाकाला जबर दुखापत झाली असल्याने फिर्यादी सौ. रंजना भैयालाल सुरजोसे वय २६ वर्ष रा. सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२५ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**७) प्रकृती खराब होवुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ३०/१०/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील मृतक साजन जनार्धन मेश्राम वय ३० वर्ष रा. सुभाषवार्ड भोजापुर, भंडारा याची दारू पिल्याने प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे आकस्मिक विभागात आणले असता त्यास डॉ.नी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेतो वरून व मृतक चे आईचे बयाना वरून सरतर्फे पोना. पुराम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**८) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ३०/१०/२०१७ चे ११.४५ ते १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक नरेद्र वासुदेव राऊत वय ४० वर्ष रा. लाला लजपतराय वार्ड भंडारा याने त्याचे स्वतःचे घरी कोणीही घरी हजर नसतांना समोरचे खोली मध्ये सिलींगच्या कडीला दुपट्टा बांधुन गळफास लावुन मृत अवस्थेत लटकलेला मिळुन आल्याने फिर्यादी सौ. मंदा नरेन्द्र राऊत वय ३७ वर्ष, रा. लाला लजपतराय वार्ड भंडारा यांना दिसुन आल्याने यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**९) गळफास लावुन आत्महत्या केल्याने इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ३०/१०/२०१७ चे ००.३० वाजता दरम्यान यातील मृतक तुळसीराम भाऊराव डोंगरे वय ४८ वर्ष रा. सरदार नगर तुमसर याने त्याच्या घरातील लोखंडी पाईपला दुपट्टा बांधुन गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी नंदकिशोर बापुजी डोंगरे वय ४५ वर्ष रा. सरदार नगर तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. हावरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**१०) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :–**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी कारधा,पवनी व जवाहरनगर येथे अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू किंमती १५००/–रु. व ९०० मिली लिटर देशी दारू किंमती २५० /रु व जुगारातुन कि. १२०/रु असा एकुण १,८७०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०५ तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८१ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता